# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

२०२०

गुन्हे शाखा, नवी मुंबई

दिनांक २२.०१.२०२०

## ''ब्राउन शुगर'' विक्री करण्यासाठी आलेल्या चौघांच्या टोळीला अंमली पदार्थ विरोधी कक्षाने गजाआड केलेबाबत

दि. २१/०१/२०२० रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोहवा/८४९ शेख यांना एपीएमसी पोलीस ठाणे हदद्दीत चार इसम ''**ब्राउन शुगर**'' हा अंमली पदार्थ विक्री करण्यास येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्यावरून अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वपोनि.रविंद्र बुधवंत यांनी एपीएमसी पोलीस ठाणेच्या हद्दितील पी एम सी बॅकेच्या समोरील झाडाखाली, सेक्टर १९ ई, वाशी नवी मुंबई येथे सापळा लावुन चार इसम नामे १) इमरान हसन खान, वय— ३६ वर्षे, धंदा हमाली काम, रा. ए—२, रूम नंबर २०१, आय सी एल स्कुल जवळ, सेक्टर २१, तुर्भे गाव, नवी मुंबई २) पांडूरंग बलभीम चौरे, वय ३५, धंदा— बेकार रा. एस एस २, रूम नंबर १०४, सेक्टर १८, कोपरखैरणे, नवी मुंबई ३) सोहेल हसन खान,वय ३४ वर्षे, धंदा माथाडी कामगार, रा सी विंग, रूम नं. १/१, महाराष्ट्र कॉ. ऑप. सोसा, से. २६, कोपरीगाव ४) निकुंज अनिल कदम, वय २५ वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा. रूम नं. ५०१, शिवालीक सोसा, प्लॉट नं. २६, से. ०५, उलवे, नवी मुंबई यांना ताब्यात घेतले सदर इसमांच्या अंगझडतीत **१२ ग्रॅम वजनाचा अंदाजे १,२०,०००/— रू.किंमतीचा ''ब्राउन शुगर''** हा अंमली पदार्थ मिळुन आलेला आहे. सदर आरोपी विरूध्द एपीएमसी पोलीस ठाणे गुरनं.१५/२०२० एनडीपीएस कायदा १९८५ चे कलम ८ (क), २२,२९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून आरोपींना अटक केलेली आहे. गुन्हयाचा तपास सपोनि. निलेश माने हे करीत आहेत.

सदरची कारवाई श्री प्रविणकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, गुन्हेशाखा, नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली श्री अजय कदम, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हेशाखा, नवी मुंबई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र बुधवंत, सपोनि निलेश माने, पोहवा/५३८ ईनामदार, पोहवा/२९२ चौधरी, पोहवा/१३०१ उटगीकर, पोहवा /५७८ गायकवाड, पोहवा/८४९ शेख, पोहवा/१२०२ पिरजादे, पोना/२१२९ जाधव, पोना/२०५७ भालेराव, पोना २२६५ नाईक, मपोशि/१२२४२ ठाकूर, चापोशि/३५८० सांगोलकर यांनी केली.

———————